'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
मराठी भाषा आणि साहित्य विशेषांक Vol. 3 Issue. 3
ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2016

# महानुभाव वाङ्मयातील दुष्काळ

**प्रा. अनिल भि. भगत**
**रामकृष्ण महाविधालय दारापूर**
**ता. दर्यापूर जि. अमरावती.**

*यादवांच्या काळात उदयाला आलेल्या महानुभाव पंथाने श्रीकृष्णभक्तीचा मार्ग खुला करण्यासाठी लोकभाषेतून ग्रंथरचना केली. पंचकृष्णावतार यांवर आधारित असलेले वाङ्मय हे यांचे प्रमुख ग्रंथ बनले. त्यातील श्रीचक्रधरांचे चरित्र म्हणून 'लीळाचरित्र' आणि 'गोविंदप्रभुचरित्र' या चरित्र ग्रंथांमधून तत्कालिन समाज जीवनाविषयीचे आशय सुत्रे आढळून आलेले आहेत. समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा, धार्मिकअवडंबर, दैनंदिन व्यवहार याचबरोबर राजकीय आणि आर्थिक जीवनाचे काही प्रमाणात दर्शन घडते. दृष्टांतपाठ, मुर्तिप्रकाश, स्थलवर्णने, स्मृतीस्थळ, पूजावसर हे ग्रंथ महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान आणि आचारधर्म सांगणारे असले, तरी त्यातून बऱ्याच प्रमाणात यादवकालीन आणि बहामनीकालीन समाजजीवनाविषयीचे आशय प्रकट झालेले दिसतात. त्याच बरोबर दुष्काळसंबंधीच्या बऱ्याच लीळादेखील आढळून आलेल्या आहेत.*

भौगोलिक आणि प्राकृतिक वातावरणातील मानवी संस्कृतीची जडण-घडण झालेली आहे. ही मानवी जीवनाच्या संदर्भात सांस्कृतिक प्रक्रिया घडत असतांना, आदिम मानवाला भौगोलिक आणि प्राकृतिक घटकांशी आधारभूत असलेल्या पाऊस पाण्याचे कोडे न ऊलगडल्याने मानवाने पावसाला देवतास्वरूप मानलेले आहे. म्हणून ज्या-ज्या वेळी पाऊस पडला नाही, त्या-त्या वेळी मानवी जीवनाची वाताहत झालेली आहे. पाऊस पडावा म्हणून त्याची पर्जन्यसुक्ते प्राचीन ग्रंथात आढळतात. मात्र पाऊस हा नियमित येतोच असे नाही. तो कधी येतो तर कधी येतच नाही. त्यामुळे सारे जनजीवन विस्कळीत होते. त्यातून मानवी जीवनाची वाताहत होते. तर कधी पाऊस आलाच, तर तो कमी प्रमाणात अथवा खूप मोठ्या प्रमाणात येतो. त्यानूतच दुष्काळ हा संभवतो. तेव्हा कृषिधिष्ठित सर्वसामान्य माणसाच्या गरजा पूर्ण होतातच असे नाही, म्हणून त्यांना दुष्काळ भेडसावतो. याचा विचार प्रत्येक काळातील समाजातील प्रज्ञावंतांनी केलेला दिसतो. मानवाच्या उत्क्रांतीबरोबरच त्याचे निसर्गाशी नाते जुडलेले आहे. प्राथमिक अवस्थेत त्याला निसर्गातील अनाकलनिय गोष्टींचा उलगडा झालेला नसला, तरी पाणी हेच त्याचे जीवन असल्याने आणि ते पाणी पावसापासून मिळत असल्याने पाऊस पाण्यासंबंधीच्या त्याच्या श्रध्दा आणि भावना सुरूवातीपासूनच रूढ झालेल्या आहेत; परंतु पाऊस हा अनियमित स्वरूपाचा व कमी-अधिक प्रमाणात पडणारा असल्याने दुष्काळग्रस्तता मानवाने अनुभवली आहे. म्हणूनच अगदी सुरूवातीच्या ग्रंथांमधून जलसृष्टी पर्जन्यवृष्टी आणि दुष्काळदेखील यांचे उल्लेख सश्रध्दपणे आढळून येतात.

त्यामुळे एखाद्या प्रदेशात पाण्याची तीव्र कमतरता भासते. पिण्याच्या पाण्याबरोबर पिकांनाही पाणी मिळत नाही. परिणामी अन्नधान्याचे उत्पन्न होत नाही. त्यालाच दुष्काळ असे संबोधले जाते. अर्थात दुष्काळ ही निसर्गदत्त घटना आहे. असे आपणाला म्हणता येईल. पावसाचे प्रमाण अत्यल्प असले तरी दुष्काळ, आणि प्रचंड प्रमाणात असले तरी दुष्काळ, यालाच कोरडा व ओला दुष्काळ असे म्हणतात.

यादवांच्या काळात उदयाला आलेल्या महानुभाव पंथाने श्रीकृष्णभक्तीचा मार्ग खुला करण्यासाठी लोकभाषेतून ग्रंथरचना केली. पंचकृष्णावतार यांवर आधारित असलेले वाङ्मय हे यांचे प्रमुख ग्रंथ बनले. त्यातील श्रीचक्रधरांचे चरित्र म्हणून 'लीळाचरित्र' आणि 'गोविंदप्रभुचरित्र' या चरित्र ग्रंथांमधून तत्कालिन समाज जीवनाविषयीचे आशय सुत्रे आढळून आलेले आहेत. समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा, धार्मिकअवडंबर, दैनंदिन व्यवहार याचबरोबर राजकीय आणि

आर्थिक जीवनाचे काही प्रमाणात दर्शन घडते. दृष्टांतपाठ, मुर्तिप्रकाश, स्थलवर्णने, स्मृतीस्थळ, पूजावसर हे ग्रंथ महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान आणि आचारधर्म सांगणारे असले, तरी त्यातून बऱ्याच प्रमाणात यादवकालीन आणि बहामनीकालीन समाजजीवनाविषयीचे आशय प्रकट झालेले दिसतात. त्याच बरोबर दुष्काळसंबंधीच्या बऱ्याच लीळादेखील आढळून आलेल्या आहेत.

महानुभाव पंथातील ‘लीळाचरित्र’ या ग्रंथात देखील दुष्काळ हा नैसर्गिक आपत्तीच्या स्वरूपातील असल्याचे दिसते. बारा वर्ष पडलेल्या दुष्काळात तिव्र पाण्याची टंचाई सांगितली असून, त्यानंतर भरपूर पाऊस पडणार; परंतु लोकांना ओल्या दुष्काळाला सामोरे जावे लागणार असेही भाकीत केले आहे.

“कुहा उदके होतील : अंजुळि सोनया घेया कां :
मग चुळिभरी उदकां सुआं का : आंजुळि सोनया घेया कां :
मग घासुभरी अन्न सुआं कां देया कां : पर तो लाभेना :”

नद्या, विहिरी आटणार, शेतीचा हंगाम येणार नाही. असे दुष्काळाविषयीचे स्वरूप लक्षात येते, तर महदाइसा पुराणातील ‘लवणाख्यान’ ऐकुण आल्याचे चक्रधरस्वामींना सांगते, तेव्हा स्वामी तिला अन्नपाण्याचा तुटवडा निर्माण करणारा दुष्काळ सांगतात; आणि संसार हा एक दीर्घस्वप्न असल्याचा विचार प्रकट करतात. त्यासाठी पुराणातील ‘लवणराजा’ दुष्काळात बायको पोरं गमावून गेल्याचा दृष्टांत महदाइसेला सांगतात. मध्ये पडलेल्या दुष्काळामुळे अन्न मिळत नाही, म्हणून लोक साधुचे सोंग घेऊन भिक्षा मागतात; परंतु भिक्षा मागणाऱ्या ढोंगी साधूंना अन्न-धान्य मिळते आणि त्यांना भिक मागण्याची सवय जडते. अर्थात या दुष्काळाचे स्वरूप फारसे तीव्र नसल्याचे लक्षात येते. बारा वर्ष पडलेल्या दुष्काळात श्रीमंत माणसांनी उघडलेल्या अन्न छत्रामध्ये साधूंना जेवण मिळते.

याप्रमाणेच गोविंदप्रभू चरित्रात

“एकी वरीखी पाउसु गेला : ते थोर अवरीखणे पडीले :”

या दुष्काळात चैत्र वैशाख महिन्यासारखे उन तापत होते. आकाशात बोटा ऐवढेच ढग असतात. पण गोविंदप्रभूंच्या कृपेने पाऊस पडतो आणि सुकाळ होतो. अर्थात त्यांचे महात्म्ये या ठिकाणी जाणवत असले, तरी हा दुष्काळ भिषण स्वरूपाचा आहे.

स्मृतीस्थळामध्ये दुष्काळामुळे अन्नाची कमतरता भासते याचा उल्लेख आलेला आहे. शिवाय कमी पावसामुळे अन्नधान्य पुरेसे पिकत नाही. तसेच वैजोबा नावाचा शेतकरी पेरणी करतो आणि चांगले पीक येऊन आपले भाग्य फळास यावे असा विचार करतो. पण अवर्षणामुळे त्याची शेती पिकत नाही; परंतु गुरूच्या कृपेने नंतरच्या वर्षी चांगले पीक येते. ‘ज्ञानप्रबोध’ मध्ये देखील अन्नधान्याचा तुटवडा झाल्याने त्याचे परिणाम भोगावे लागल्याचे आढळून आले आहे.

अशाप्रकारे महानुभाव पंथियांनी अवर्षणप्रवण दुष्काळ अधिक अनुभवलेला दिसतो आहे. पाऊस-पाण्याचा अभाव असल्याने अन्न-धान्य उत्पादन होत नाही. लोकांना त्याच्या उणिवा भासतात. म्हणजेच याठिकाणी निसर्गनिर्मित दुष्काळाचे स्वरूप आपल्याला लक्षात घ्यावे लागते.अन्न आणि पाणी या माणसांच्या मुलभूत गरजांची पूर्तता ही कृषिधिष्ठित उत्पन्न आणि निसर्गनिर्मित पाऊस यांपासून होते. शिवाय शेतीदेखील पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते. अशावेळी एक दोन वर्ष किंवा बरीच वर्ष पाऊस पडलाच नाही; तर शेती पिकत नाही व लोकांना खायला अन्न मिळत नाही. पाण्याचेही दुर्भिक्ष भासते. अशावेळी त्यांना अनेक परिणाम भोगावे लागतात. या परिणामांची प्रचिती मध्ययुगीन संत वाङ्मयातून आल्याशिवाय राहत नाही.

त्याच्या परिणामाचे भाकीत चक्रधरांच्या लीळांमधून म्हाइंभटांनी सांगितलेले आढळते. जसे, “तापी नर्मदा आदि करूनि : महानदी आदि करूनि आटतील : तेथं वीहरे कीजेतील : अंगुष्ट प्रमाण मनुष्ये होती : दोघे दोघे होतील : तीये जमतील : तीयैचि वर्तति : क्रीमीतुल्य : मग बारा वरिखे अनावृष्टी : अवर्षणे जाईल : बाराहि आदित्य तपति : बाराहि सुर्य तपतील : पर्वत आदि करूनि चुडावे खडे ऐसे भाजतील : बारा वरिखे अतिवृष्टी होईल :”

धर्मोपधर्म लोपतील, लोक बिघडतील समाजात अपप्रवृत्ती निर्माण होतील. राजेंच्या ठिकाणी धर्म राहणार नाही. त्यांच्या बायकांना खायला अन्न मिळणार नाही. सर्वसामान्य माणसे तर अन्नासाठी एकमेकांवर तुटून पडतील असे भयंकर परिणाम चक्रधरांनी सांगून ठेवलेले आहे. त्याची प्रचिती प्रत्येक दीर्घकाळ पडलेल्या दुष्काळाच्या वेळी आलेली आहे. मध्ये एका कुटूंबातील माणसाची पत्नी आणि तिन मुले अन्न पाण्यावाचून मरण पावतात. त्यांचा संसार उद्ध्वस्त झाल्याने तोही पत्नीच्या वियोगाने तिच्या पेटलेल्या चितेवर उडी घेऊन, आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतो. असा दृष्टांत वशिष्ट लवणाख्यानातील ‘लवण’ राजाच्या स्वप्न रूपात सांगितलेला आहे. तेव्हा दुष्काळात मृत्यूमुखी पडलेल्या जनसामान्यांची करूण कथा हृदयद्रावक बनलेली दिसते. दुष्काळात मृत्यू येऊ नये. भूक आणि उपासमार होऊ नये आणि दुष्काळ पडलाच, तर लोक देशोधडीला लागतात. असे लीळा मधून प्रत्ययास येते. जसे, “एकी वरीखी दुकळु पडिला : मग आम्ही अवघे माहाजन तेलंग देशा गेलो : अवघे महात्म्ये जालो : एकाचा गोरक्ष केला : एक गावांतु सांघावेया जातिः अवघा लोक साउमा ए : कणिक तांदुळ तुप द्रव्ये आणिति : कणिक तांदुळ तुप घेऊ : द्रव्ये ठेउ : ऐसा जी : दुकाळ निस्तरलो :”

एकाच वेळी महाराष्ट्रात सगळीकडे दुष्काळ पडतोच असे नाही, तर वर्षा दोन वर्षातून ठराविक ठिकाणी पाऊस पडत नाही. म्हणून असे काही अवर्षणक्षेत्रे भौगोलिकदृष्ट्या अलिकडे निश्चित केलेले आहे. म्हणजेच एखाद्या परिसरात एखाद्या वर्षी पाऊस पाण्याच्या अभावामुळे, नापिकी होऊन दुष्काळग्रस्तता वाट्याला आली, तर त्या प्रदेशातील लोक दुसरीकडच्या चांगल्या भागात स्थलांतर करतात. हा आजवरचा अनुभव आहे. तसाच अनुभव देखील चक्रधरस्वामींनी प्रस्तूत लिळेत सांगितलेला आहे. म्हणजेच दुष्काळग्रस्तांची स्थलांत्तराची प्रक्रिया ही दीर्घकाळ चालत आलेली आहे; असे यातून स्पष्ट होतेच, परंतु दुष्काळी भागात शेठ, सावकार, राजे आणि सधन मंडळीकडून अन्नछत्र उघडल्याने दुष्काळग्रस्तांचे स्थलांतर थांबते. मात्र अशा अन्नछत्रात बाहेर जेवणासाठी अन्न पदार्थ देऊ नये. तर तेथेच जेऊ घालावे असा दंडक केलेला होता. त्यामुळे महानुभाव शिष्यांना भिक्षा दिली जायची नाही. अन्नछत्रातच जेवणाचा आग्रह केला जायचा. त्याचा परिणाम असा झाली की, एका शिष्याला तेथे जेवण करता येत होते; परंतु एका टेकडावर ध्यानस्थ बसलेल्या गुरूसाठी अन्नपदार्थ नेता येत नव्हता. त्यावेळी तो अन्नछत्राबाहेर पडल्यानंतर ओकारी करून उलटीद्वारे पोटातील तांदुळ भात बाहेर काढायचा; आणि ते अन्न धुवून आपल्या गुरूला द्यायचा. अशी ही गुरूभक्ती याठिकाणी दिसत असली, तरी त्याची झळ त्याला पोहचते आणि तो कृश बनतो.

महानुभावीय शिष्य छदोंबा याला एक शेतकरी आपल्या घरी आश्रयाला ठेवतो. त्या दरम्यान दुष्काळ पडून तो शेतकरी मरण पावतो. त्याच्या मुलाबाळांचा आणि पत्नीचा आधार खुंटतो. तेव्हा तो शिष्य शेतकऱ्याच्या पत्नीच्या विनंतीनुसार त्या कुटूंबाचा आधार बनतो; परंतु दुष्काळाचे परिणाम जाणवू लागल्याने तो त्या शेतकऱ्याच्या कुटूंबासह स्थलांतर करतो असे असले, तरी संसारात गुरफटलेल्या माणसाच्या ठिकाणी परमेश्वराप्रति भक्तीभाव दिसत नाही व तो मुळ ईश्वरापासून दूर जातो. असे चक्रधरस्वामींना या लिळेतून सुचवायचे आहे. तसेच दुष्काळात महानुभाव पंथाच्या शिष्यांना भिक्षा मिळत नाही. म्हणजेच लोकांच्याच खाण्या-पिण्याची मारामार असते; परंतु कधी ना कधी भिक्षा मिळेल असे चक्रधर स्वामींना वाटते. कारण दुष्काळात जर भिक्षा मिळाली नाही तर काय करावे? हा प्रश्न महादाइसेला पडलेला असतो. याचा अर्थ असा की, दुष्काळाच्या परिणामाची जाणीव तिला होती. चक्रधरस्वामींनी यादवकालीन

मानवनिर्मित आणि निसर्गनिर्मित दुष्काळाचे परिणाम त्यांचा शिष्य भटोबास याला मध्ये असे सांगितले आहे की, “श्री प्रभूमागां उत्तरेकडून म्लेंच्छ येतील : ते जाधवांते मारतील : आणि राज्य घेतील : मग काळे करौनिया राष्ट्रासि समुळची विनश्यंती होईल गा : यावरी भटी पुसिले : राज्य घेतलेल्या विनश्यंती ते कैसी जी?” “म्लेंच्छ बंद धरतील : तेणे लोक देशांत्तरा जातील : जे एथ असती ते दुकाळे मरतील : या परी एथील विनश्यंती होईल :”त्याचबरोबर या समाजाला निसर्ग प्रकोपाने अर्थात दुष्काळानेही होरपळून काढले होते. याप्रमाणेच गोविंदप्रभू चरित्रातही दुष्काळाचे परिणाम इतके भयंकर आहेत की त्यांच्या शिष्यांना लोक भिक्षा घालित नाही. त्यामुळे खूप मोठे दुःख व उदासिनता वाट्याला येते. त्यावेळी अबइसा गोविंदप्रभूंना पाऊस पडण्यासाठी विनंती करायला सांगतात आणि खरच पाऊस येतो तेव्हा सर्वांना आनंद वाटतो.

महानुभावीय ग्रंथातील स्मृतिस्थळ या ग्रंथात देखील दुष्काळाबद्दलचे जे अनेक उल्लेख पहावयास मिळतात. त्यात दुष्काळाचे परिणामही आपल्या निदर्शनास येतात. दुष्काळात महानुभाव शिष्यांना भिक्षा कमी मिळते. त्यांचे पोट पुरेसे भरत नाही. तरीही गुरुभक्तीपोटी शिष्य आपल्या पात्रातील अन्न गुरूला देतो. दुसऱ्या शिष्याला मात्र ते उष्टे अन्न गुरूला देऊ नये असे वाटते. पण त्यात गुरूबद्दलचे प्रेम या लिळेतून स्पष्ट होते. याच बरोबर दुष्काळात शिष्यांना पुरेशी भिक्षा मिळत नाही. तेव्हा ते गुरू नागदेवाचार्य यांना या गोष्टीचा सुगावा लागू नये, म्हणून झोळीमध्ये खाली कापडांच्या चिंध्या टाकतात. आणि भाकरी व तुकडे (अन्न) वर ठेवतात; आणि पुरेशी भिक्षा मिळाल्याचे भासवितात; परंतु हा प्रकार लक्षात आल्यानंतर नागदेवाचार्य आपल्या जवळच्या पैशातून अन्नधान्य आणून शिष्यांना खावू घालतात. तसेच एकदा दुष्काळ पडला असता, महानुभावीय शिष्य देशोधडीला लागतात. ऐकेठिकाणी राजाने उघडलेल्या अन्नछत्रात दंतीगोपाळबास हा भिक्षा मागावयास जातो. तेथे त्याला भिक्षा न देता जेवायला सुचवतात. पण तो जेवत नाही. भिक्षा घेऊन गंगेच्या काठी जेवायचे म्हणतो. अर्थात दुष्काळग्रस्तांनी अन्नछत्रातच जेवण करावे असा नियम असल्याने त्याला भिक्षा मिळत नाही. आणि आपल्या हातून आचारभ्रष्टता होऊ नये, म्हणून तोही तेथे जेवत नाही. त्यामुळे अन्नावाचून तो कृश होतो. त्याच्या शरीरात त्राण राहत नाही आणि तो मरण पावतो. असा जीवघेणा दुष्काळ या ठिकाणी दिसतो.

**निष्कर्ष -**

अशाप्रकारे चौदाव्या शतकात पडलेल्या दुष्काळाच्या परिणामाची झळ महानुभाव पंथातील शिष्यांना पोहचलेली दिसते. ते एक प्रातिनिधीक चित्र डोळ्यासमोर ठेवले, तर तत्कालिक समाजातील सर्वसामान्य माणसांच्या वाट्याला भूक, उपासमार आणि मरणही आलेले दिसते. अशाप्रकारे मान्यवर अभ्यासकांनी मध्ययुगीन महानुभाव वाङ्मयाचा अभ्यास करताना त्या काळातील दुष्काळाचे परिणाम तत्कालीन समाजजीवनाला भेडसावून गेल्याचे सांगितले आहे. महानुभाव वाङ्मयाचा अभ्यास करतांना मात्र त्यांनी प्रामुख्याने दुष्काळ या विषयावर आपले लक्ष केंद्रित केलेले नाही; तर त्या वाङ्मयाला असलेले धर्म आणि अध्यात्माचे पाठबळ आणि त्याचे स्वरूप याचीच चिकित्सा अधिक केलेली आहे. परंतु त्याच्या ओघाने का होईना त्यांच्या विश्लेषणात दुष्काळाचे स्वरूप आणि परिणाम काही प्रमाणात स्पष्ट होतात.त्यामुळे संत वाङ्मयातील दुष्काळाच्या संदर्भात या ठिकाणी केलेल्या विश्लेषणाला अधिक दुजोरा मिळतो.

ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2016

महानुभाव वाङ्मयाचा अभ्यास करताना दुष्काळात शिष्यांना पुरेशी भिक्षा मिळत नाही. दुष्काळी भागात शेठ, सावकार, राजे आणि सधन मंडळीकडून अन्नछत्र उघडल्याने दुष्काळग्रस्तांचे स्थलांतर थांबलेले दिसते. ग्रंथांमधून जलसृष्टी पर्जन्यवृष्टी आणि दुष्काळदेखील यांचे उल्लेख सश्रध्दपणे आढळून येतात.

**संदर्भ सूची -**


१. देशपांडे अ.ना , पाध्ये स.कृ.:- प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : भाग २, व्हीनस प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती, जानेवारी १९९६,
२. संपा.तुळपुळे शं.गो.,लीळा चरित्र : (उत्तरार्ध भाग २) सुविचार प्रकाशन मंडळ, धंतोली, नागपूर, पुणे, प्रथमावृत्ती, सप्टेबर १९६७,
३. संपा. कोलते वि.भि., :- श्रीगोविंदप्रभुचरित्र : स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, चौथी आवृत्ती, ऑगस्ट १९९५,
४. संपा. नागपुरे पुरूषोत्तम, सौ. नागपुरे इंद्रायणी , लीळाचरित्र : श्रीचक्रधर जयंत्युत्सव, अमरावती, द्वितीयावृत्ती, डिसेंबर २००४, प
५. संपा. कोलते वि.भि., कोलते अरूण ज.:- ज्ञानप्रबोध : अरूण प्रकाशन मलकापूर, १९७३.
६. देशपांडे अ.ना , पाध्ये स.कृ.;- प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : भाग ३, व्हीनस प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती, मे २००२,